ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५


# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १८ | पुणें, बुधवार तारीख ६ ऑगस्ट, १९५२ | अंक ३१


## विविध माहिती

**कॉलेज बँकेचा उपक्रम**—जबलपूर येथील गोविंदराम सेकसोरिआ कॉलेजच्या प्रिन्सिपलनीं कॉलेजमध्यें एक बँक काढली आहे. बँकिंगच्या व्यवहाराचें शिक्षण देण्यासाठी हा उपक्रम करण्यांत आला आहे. ह्या बँकेचे अंतर्गत व्यवहार बँकांच्या मामुली पद्धतीनेंच चालतील. पण पैशाचे सर्व व्यवहार फक्त कॉलेजच्या विद्यार्थ्यांपुरतेच मर्यादित रहातील.

**जपानमध्यें टेलिव्हिजन**—येत्या सप्टेंबर महिन्यापासून जपानमध्यें टेलिव्हिजनचे कार्यक्रम प्रक्षेपित करण्यांत येणार आहेत असें समजतें. हे कार्यक्रम ग्रहण करणारे ३,००० सेट्स सध्या जपानमध्यें आहेत.

**निर्णय घेतांना कामगारांचा सल्ला**—प. जर्मन सरकारनें कामगारविषयक एक नवा कायदा करण्याचें ठरविलें आहे. ह्या संकल्पित कायद्याप्रमाणें प्रत्येक कंपनीला आपल्या डायरेक्टर बोर्डावर एक तृतीयांश डायरेक्टर्स आपल्या कामगार वर्गांतून घ्यावे लागतील. कोणताहि व्यापारी निर्णय घेतांना कामगारांना त्यांची जबाबदारी संभाळण्याची आणि सवलती वापरण्याची संधि दिली पाहिजे, असें प. जर्मन सरकारचें धोरण आहे.

**रॉकफेलर फौंडेशनची मदत**—अलाहाबादच्या शेतकी-संस्थेला अमेरिकेच्या रॉकफेलर फौंडेशनतर्फे १५ लाख डॉलर्सची देणगी मिळाली आहे. ह्या देणगींतून कांहीं यंत्रसामुग्री आणि शास्त्रीय उपकरणें खरेदी करण्यांत यावयाचीं आहेत.

**नेपाळच्या गिर्यारोहकाचा सन्मान**—गौरीशंकर शिखरावर आरोहण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या स्वित्झरलंडच्या तुकडीबरोबर तेनसिंग नांवाचा एक नेपाळी गेला होता. तो शिखरापासून ७-८ शे फुटांपर्यंत चढला होता. नेपाळ सरकार तेनसिंग ह्याचा योग्य तो सन्मान करण्याचा विचार करीत आहे

**मुक्या-बहिऱ्यांचें शिक्षण**—उत्तर प्रदेशांतील मुक्या व बहिऱ्या मुलांना शिक्षण देणाऱ्या संस्थांना देण्यांत येणारी सरकारी मदत आतांपर्यंत एकवारच देण्यांत येत असे. परंतु येथून पुढें अशी मदत दरवर्षी देण्याचें राज्य-सरकारनें ठरविलें आहे. डेहराडून येथें अंधांना शिक्षण देण्याचें एक केंद्र आहे. त्या केंद्रांत शिकणाऱ्या प्रौढांना मध्यवर्ती सरकार भत्ता देत असे. ह्या भत्त्यापैकीं निम्मा भत्ताहि उत्तर-प्रदेश सरकार आतां सोसणार आहे.

**पंचवार्षिक कार्यक्रमावर नजर**— निरनिराळ्या राज्यांत पंचवार्षिक कार्यक्रमानुसार ज्या योजना चालू करण्यांत येतील त्यांविषयीं नीट माहिती मिळावी म्हणून सर्व राज्यांत खास अधिकारी नेमण्याचा भारतीय सरकार विचार करीत आहे.

**भारतामधील घड्याळांचें उत्पादन**—१९५१ सालीं भारतांत भिंतीवर लावण्याचीं १३,०७९ घड्याळें तयार करण्यांत आलीं. १९५२ च्या जानेवारी महिन्यांत १,०५८ घड्याळांचें उत्पादन झालें. ही माहिती चालू पार्लमेंटमध्यें एका प्रश्नाला उत्तर म्हणून देण्यांत आली.

**संयुक्त राष्ट्र-संघटनेची कचेरी**— संयुक्त-राष्ट्र-संघाच्या निरनिराळ्या शाखांच्या बैठकी चालू असतां रोज सुमारे १,००० पाहुणे कामकाज पहाण्यासाठी संघाच्या कचेरीला भेट देतात. संघाची कचेरी न्यूयॉर्क येथें असून अमेरिकेच्या सर्व भागांतून व जगाच्या निरनिराळ्या भागांतून हे पाहुणे आलेले असतात.

**ब्रिटिश पार्लमेंटच्या सभासदांचा पगार**—ब्रिटिश पार्लमेंटच्या सभासदांना सध्यां सालीना १,००० पौंड पगार मिळतो. तो वाढविण्यांत यावा अशी मागणी करण्यांत आली होती. पण मुख्य प्रधान ह्यांनीं पगार वाढविण्याच्या अगर त्यासंबंधीं चौकशी करण्यासाठी रॉयल कमिशन नेमण्याच्या विरुद्ध निर्णय घेतला आहे.

**एडिंबरो येथील चित्रपट-प्रदर्शन**—एडिंबरो येथें ६ वें आंतरराष्ट्रीय चित्रपट-प्रदर्शन भरणार आहे. ह्या उत्सवासाठी भारतांतील दोन अनुबोध-पटांची निवड करण्यांत आली आहे. 'मध्यभारत' व 'स्मृतिशेष-साम्राज्य' हे दोन चित्रपट निवडण्यांत आले असून ते भारतीय सरकारच्या चित्रपटखात्यानें तयार केलेले आहेत.

**अमेरिकेला पडलेला संपाचा भुर्दंड**—अमेरिकेंत नुकत्याच झालेल्या पोलाद-कामगारांच्या संपामुळें १,४०,००,००,०००पौंड नुकसान झालें. संपामुळें २०,००,००० कामगार बेकार झाले आणि १,७०,००,००० टन कमी पोलाद निर्माण झालें. हा संप ५३ दिवसपर्यंत चालला होता.

**भारतासाठीं अधिक गंधक**—चालू वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीसाठी अमेरिकेच्या व्यापारी-खात्यानें १३,०७५ टन गंधक भारताला निर्यात करण्यास परवानगी दिली आहे. व्यापारखात्यानें एकूण २,३२,५०० टन अशुद्ध गंधक आणि ७,५०० टन शुद्ध गंधक निर्यात करण्याचे परवाने दिले आहेत.

**ऑस्ट्रेलिआला भारतीय कोळसा पाहिजे**—गॅसचा पुरवठा करण्यासाठी उपयोगी पडणारा बराच कोळसा ऑस्ट्रेलिआला भारताकडून पाहिजे आहे. ऑस्ट्रेलिआंतील कोळशाचें उत्पादन खूप वाढलें आहे; पण गॅससाठी लागणारा विशिष्ट प्रतीचा कोळसा मात्र अद्याप पुरेसा निघत नाहीं.

## सन १९२५ च्या मुंबई सहकारी कायद्यांत दुरुस्ती

### सरकारचें नवें बिल

प्रस्तुत बिलाचा उद्देश १९२५ च्या सहकारी कायद्यांत दुरुस्ती करून खालील सुधारणा करण्याचा आहे:—

(१) सर्व सहकारी मंडळ्यांची यादी दर वर्षी प्रसिद्ध होत असे, त्याऐवजी ती दर तीन वर्षांनी प्रसिद्ध करण्यास परवानगी देणें.

(२) करार करण्यास लायक नसलेल्या इसमास मंडळीचा सभासद होण्याची मनाई करणें. (कोणत्याहि इसमास, तो १८७२ चा हिंदुस्थानचा कराराविषयीं कायद्याच्या ११ व्या कलमान्वयें करार करण्यास लायक इसम असेल तो प्रसंग खेरीज करून, मंडळीचा सभासद म्हणून दाखल करून घेतां कामा नये. प्रस्तुत सुधारणा अमलांत येण्यापूर्वी केलेल्या कोणत्याहि मंडळीच्या नोंदणीस बाध येतो असें समजतां कामा नये.)

(३) मंडळीची वार्षिक साधारण सभा घेण्याची मुदत तीन महिन्यांपेक्षा अधिक नाहीं, अशा मुदतीपर्यंत वाढविण्याचा अधिकार, रजिस्ट्रार ऑफ को-ऑपरेटिव्ह सोसायटीज ह्यांना देणें आणि अशा सभा कायद्यानें ठरविलेल्या मुदतींत न घेतल्यास त्याबद्दल मंडळीचे पदाधिकारी व अंमलदार ह्यांस शिक्षा देण्याची तरतूद करणें. (तीन वर्षांहून अधिक नाहीं अशा मुदतीसाठीं अंमलदार किंवा कमिटीचा सभासद म्हणून निवडला जाण्यास किंवा अंमलदार अथवा कमिटीचा सभासद होण्यास अपात्र म्हणून जाहीर करण्याचा रजिस्ट्रार ह्यांस अधिकार देण्यांत येत आहे. जर तो अंमलदार मंडळीचा नोकर असेल, तर त्यास १०० रुपयांहून अधिक नाहीं इतका दंड होऊं शकेल हा दंड जणूं असा दंड कोर्टानें बसविला होता असें समजून वसूल केला जाईल.)

(४) अज्ञान व भ्रमिष्ट इसमांना सभासदत्वाचे हक्क वारसा हक्कानें किंवा इतर रीतीनें संपादन करतां यावे म्हणून तरतूद करणें. (कलम ६ अ मधील कोणत्याहि ठरावामुळें अज्ञान किंवा भ्रमिष्ट इसमास सभासदत्वाचे हक्क त्यास वारसा हक्कानें मिळण्यास किंवा त्यानें ते इतर रीतीनें संपादन करण्यास प्रतिबंध होणार नाहीं. परंतु, अशा रीतीनें हक्क संपादन केल्यामुळें त्याजवर येणारी जबाबदारी मंडळीच्या शेअरांतील त्याचे हितसंबंध आणि न भरलेले डिव्हिडंड, तसेंच लोन स्टॉक बॉंडस, कोणतेहि असल्यास व त्यांच्यावर मिळालेलें व अदा न केलेलें व्याज ह्यांच्यापुरतीच मर्यादित राहील. अशा कोणत्याहि अपात्रतेखालीं असणाऱ्या इसमानें, त्याची अपात्रता संपल्यावर, सभासद होण्याच्या आपल्या इरायासंबंधीं इकरार मंडळीस सादर केला पाहिजे. मंडळीस त्यास सभासद म्हणून दाखल करून घेण्याचा अधिकार आहे आणि जर ती को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी असेल, तर अशा मंडळीनें त्यास सभासद म्हणून दाखल करून घेतलें पाहिजे. अशा रीतीनें दाखल करून घेतलेला इसम, मंडळीच्या इतर कोणत्याहि सभासदाप्रमाणें सभासदाचे सर्व हक्क व विशेष हक्क मिळण्यास हक्कदार होईल, तसेंच जबाबदाऱ्यांना पात्र होईल.)

(५) हिशेब तपासणींत सहकारी मंडळ्यांच्या निदर्शनास आणून दिलेले त्यांच्या कामांतील दोष निर्दिष्ट केलेल्या मुदतीच्या आंत सुधारण्यास सहकारी मंडळ्यांना फर्माविण्याचा रजिस्ट्रार यांस अधिकार देणें.

(६) मध्यवर्ती भांडवल पुरविणाऱ्या संस्थांना, ज्यांच्या मालकीच्या जमिनी आहेत व ज्यांना त्या प्रत्यक्ष भांडवल पुरवितात त्या इसमांकडून इकरार लिहून घेण्याचा अधिकार देण्याची तरतूद करणें.

(७) योग्य बाबतींत प्रकरण लवादाकडून काढून घेण्याचा अधिकार रजिस्ट्रार ह्यांस देणें. (पुढील मुद्यांपैकीं कोणत्याहि मुद्यावर असेल तें खेरीज करून, कोणतेंहि प्रकरण काढून घेतां येणार नाहीं:—[अ.] रजिस्ट्रारनें नेमून दिलेला इसम किंवा पंच दोन महिन्यांचा किंवा रजिस्ट्रार परवानगी देईल अशा वाढविलेल्या मुदतीच्या आंत तक्रारीचा निवाडा करण्यास चुकले आहेत; [ब] रजिस्ट्रारनें नेमून दिलेल्या इसमापुढें चालविलेलें किंवा कोणत्याहि पंचापुढें चालविलेलें कामकाज प्रसंगाप्रमाणें, रजिस्ट्रारनें नेमून दिलेल्या इसमानें किंवा कोणत्याहि पंचानें लांच घेतल्यामुळें किंवा त्याच्या गैरवर्तणुकीमुळें निरर्थक ठरलें आहे.

(८) असिस्टंट रजिस्ट्रार यांस ५९ कलमाचा दाखला देऊन एखाद्या अर्जदारास ५४ अ (१) अन्वयें दोष सुधारण्याची संधि न देण्याचा जो अधिकार आहे, त्यास प्रतिबंध करणें.

(९) राज्य सरकारच्या सामान्य किंवा विशेष हुकुमांना पात्र राहून कलेक्टर ह्यांस, ह्या कलमा अन्वयें त्यानें चालविण्याजोगे अधिकार, असिस्टंट किंवा डेप्युटी कलेक्टरच्या दर्जाहून कमी दर्जाच्या नसलेल्या कोणत्याहि अंमलदाराकडे सोंपवून देण्याचा अधिकार देणें.

---

### श्री. व्ही. पी. वर्दे

बर्कले (कॅलिफोर्निया) येथें ४ ऑगस्ट पासून सुरू झालेल्या आंतरराष्ट्रीय शेती व सहकारी क्रेडिट परिषदेस उपस्थित होण्यासाठीं बॉंबे प्रॉ. को. बँकेचे ऑनररी मॅ. डायरेक्टर, श्री. व्ही. पी. वर्दे व रिझर्व्ह बँकेच्या बँकिंग खात्यांतील डेप्युटि चीफ ऑफिसर श्री. एम. एस. नाडकर्णी हे कलकत्ता मार्गे विमानानें गेले. ओरिसाचे डेव्हलपमेंट मंत्री श्री. दीनबंधु साहु आणि मध्यवर्ती सरकारच्या अन्न-शेती खात्यांतील डॉ. एस. आर. सेन हेहि परिषदेस उपस्थित होत आहेत.

---

### श्री. जे. व्ही. जोशी

श्री. जे. व्ही. जोशी, इंटर नॅशनल मॉनेटरी फंडाचे पूर्वींचे एक्झिक्यूटिव्ह डायरेक्टर, ह्यांची भारत सरकारच्या अर्थ खात्यांत खास कामासाठीं नेमणूक करण्यांत आली आहे. कराच्या सध्याच्या परिस्थितीचें वास्तव चित्र तयार करण्यासाठीं चौकशी करण्याचें प्राथमिक काम त्यांच्याकडे सोंपविण्यांत येईल.

---

### श्री. व्ही. आर. सोनाळकर

इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशनचे मॅनेजिंग डायरेक्टर, श्री. व्ही. आर. सोनाळकर, हे गेल्या आठवड्यांत वॉशिंग्टनला गेले. कॉर्पोरेशनला इंटरनॅशनल बँकेकडून मिळावयाच्या कर्जाची रक्कम व अटी ह्यांविषयीं तेथें ते वाटाघाटी करतील.

---

### श्री. कल्याणी ह्यांचें तैलचित्र

सातारा जिल्हा को. लँड मॉर्गेज बँकेचे चेअरमन श्री. आणाप्पा नारायण कल्याणी यांच्या तैलचित्राचा अनावरण समारंभ कराड येथील बँकेच्या ऑफिसांत रविवार ता. ३ आगष्ट १९५२ रोजीं दुपारीं ३ वाजतां नामदार यशवंतराव बळवंतराव चव्हाण, नागरी पुरवठा मंत्री, मुंबई राज्य, यांचे हस्तें झाला.

# अर्थ

बुधवार, ता. ६ ऑगस्ट १९५१





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## भारताचा पूर्व आशियाशीं व्यापार

भारताचा पूर्व आशियाशीं चालणाऱ्या व्यापाराची माहिती येथें थोडक्यांत दिली आहे. त्यावरून ह्या विभागाचें भारताच्या व्यापारी दृष्टीनें महत्त्व लक्षांत येईल. पाकिस्तान, बर्मा, सिलोन, मलाया, इंडोनेशिया, इंडोचायना, थायलंड, चीन, जपान, हाँगकाँग व फिलिपाइन्स ह्या देशांशीं होणाऱ्या व्यापाराचा विचार त्यांत केलेला आहे.

त्या देशांपैकीं जपान वगळला तर बाकीच्या देशांतील मुख्य आर्थिक व्यवहार शेतीचा, खाणींचा अथवा रबराच्या मळ्यांचा आहे. तांदूळ, मसाल्याचे जिन्नस, कच्चा ताग, कपास, तेलबिया, तेल, टिन, लांकूड, रबर, इत्यादींच्या निर्गतीचा त्यांच्या निर्गत व्यापारांत मुख्यतः समावेश होतो. ते पक्का माल आयात करतात व कच्चा माल निर्गत करतात. भारत त्या देशांकडून तांदूळ घेतो व त्यांस कपास-कापड देतो. त्या देशांच्या एकूण व्यापारापैकीं ६% व्यापार भारताशीं होतो. भारताच्या दृष्टीनें त्या सर्व देशांत ब्रह्मदेश अधिक महत्त्वाचा आहे. युद्धोत्तर काळांत भारताच्या कापडाचा त्या देशांतील खप वाढला आहे.

१९३८-३९ मध्यें भारताच्या एकूण निर्गतीपैकीं २५% त्या देशांकडे झाली व भारताच्या एकूण आयातीपैकीं ३२% आयात ह्या देशांतील मालाची होती. त्या वेळीं भारत अखंड होता म्हणून हें प्रमाण एवढें मोठें होतें. १९४८-४९ मध्यें ह्या विभागाशीं (पाकिस्तान वगळून) व्यापार पुष्कळच कमी झाला. (१३% निर्गत व १०% आयात) त्या नंतर निर्गत थोडी वाढली पण १९५१-५२ मध्यें त्यांत पुनः घट झाली त्यावर्षी भारतीय निर्गतीच्या ११·९% निर्गत त्या देशांकडे गेली व भारतांतील आयातीच्या १२·८% माल त्या देशांतून आला. युद्धपूर्व काळांत जपान व ब्रह्मदेश ह्यांतूनच मुख्यतः माल आयात होई. युद्धानंतरच्या काळांत ती आयात अनेक देशांवर पसरलेली आढळते. ह्या देशांचें भारताच्या परराष्ट्रीय व्यापारांतील स्थान तुलनेनें खाली गेलें असलें, तरी निर्गतीची किंमत दुप्पट व आयातीची किंमत तिप्पट झालेली आहे

पूर्व आशियाशीं चालणाऱ्या भारताच्या व्यापारांत युद्धपूर्व वर्षी व १९४८-४९ मध्यें अनुक्रमें ९ कोटी रु. ची व ४ कोटी रु. ची प्रतिकूल तफावत होती. १९४९ मध्यें १३ कोटी रु. चा वाढावा राहिला व १९५०-५१ मध्यें तो वाढावा ४८ कोटी रु. झाला. भारतांतील गिऱ्हाइकांच्या सोईच्या व हिताच्या दृष्टीनें सरकारनें कापडाच्या निर्गतीवर बंधनें घातल्यामुळें १९५१-५२ मध्यें १२ कोटी रु. ची पुनः तूट आढळली. पाकिस्तानशीं भारताचा होणारा व्यापार प्रथमापासून तुटीचा आहे.

पूर्व आशियाकडे तागाचा माल, कपास-कापड व कोळसा ह्यांची मोठी निर्गत होते. भारत निर्गत करतो त्यापैकीं दोन तृतीयांश कोळसा हे देश घेतात. १९४८-४९ मध्यें त्यांनीं भारताच्या निर्गत कोळशापैकीं ९०% कोळसा घेतला, परंतु त्यांत समुद्रमार्गें पाकिस्तानला पाठविलेल्या कोळशाचाहि समावेश होता आणि तोच कोळसा एकूण निर्गतीपैकीं ४०% होता.

जपानची तीव्र स्पर्धा असतांनाहि युद्धपूर्व काळांत भारताच्या कापडाच्या निर्गतीपैकीं ७०% निर्गत ह्या देशांकडे जाई. एकटा ब्रह्मदेशच ५०% निर्गत घेई. २७% निर्गत सिलोन व मलाया ह्यांत खपत असे. १९४८-४९ मध्यें, ३४ कोटी वार निर्गतीपैकीं १६ कोटी वार कापड एकट्या पाकिस्तानानें घेतलें. पुढें पाकिस्तानची खरेदी कमी झाली पण मलायाची वाढली. १९४९ मधील अवमूल्यन आणि कोरियन युद्धामुळें पूर्व आशियांत झालेली ग्राहकांच्या उत्पन्नांत वाढ ह्यांमुळें त्या विभागांत कापडाची मागणी आणखी वाढली, परंतु हिंदी उत्पादनांत घट व अंतर्गत मागणी पुरी पाडण्याची आवश्यकता ह्यांमुळें निर्गतीवर बंधनें घालणें भारत सरकारला भाग पडलें. त्यामुळें १९५१-५२ मध्यें निर्गत रोडावलेली दिसेल.

## मद्रास राज्याची औद्योगिक प्रगति

मद्रास राज्याचे उद्योगमंत्री श्री. कृष्णराव ह्यांनीं राज्याच्या विधानसभेंत १९४१-५२ ह्या कालांत मद्रास राज्यानें केलेल्या औद्योगिक प्रगतीची माहिती नुकतीच निवेदन केली. ते म्हणाले, कीं मद्रास राज्यांत १९४४ सालीं १,६९५ जॉइंट स्टॉक कंपन्या होत्या; त्यांची संख्या १९५२ सालीं ३,५४४ इतकी झाली आहे. १९४५ सालीं राज्यांत ३४९ तेलाच्या गिरण्या होत्या, त्या १९५२ सालीं १,१९२ इतक्या झाल्या आहेत. साखरेचे कारखाने १४ होते तेथें आतां १७ आहेत. सिमेंटचे कारखाने तीन होते; आतां ४ झाले आहेत; आणि कापडाच्या गिरण्यांची संख्या ६७ पासून ७५ पर्यंत गेली आहे. सध्याच्या द्रव्यविषयक अडचणी लक्षांत घेतां सरकारला स्वतःच्या मालकीचे उद्योगधंदे काढतां येणें शक्यच नव्हतें. त्यामुळें देशांतील खाजगी भांडवलाला उत्तेजन देणें आणि परकीय भांडवलाला आवाहन करणें येवढाच मार्ग सरकारपुढें होता. ज्या ज्या उद्योगधंद्यांत परकीय भांडवल स्वीकारण्यांत आलें, त्या त्या धंद्यांत हिंदी माणसांना शिक्षण देणें आणि धंद्यांत वापरण्यांत येणाऱ्या पेटंटसची संपूर्ण माहिती देणें अशा अटी सरकारनें घातल्या आहेत. परकीय उद्योगपती मजूरवर्गाला चांगली वागणूक देत आहेत, इतकेंच नव्हे तर त्यांच्या रहाण्याची सोय करून वैद्यकीय मदतीचीही व्यवस्था करीत आहेत. मद्रास राज्यानें गेल्या पांच-सात वर्षांत केलेली औद्योगिक प्रगति डोळ्यांत भरण्यासारखी असला तरी राज्याचें खरें दुखणें कमी उत्पादनाची शेती आहे, हें विसरून चालणार नाहीं

## बी. सी. जी. लस मोहिमेची प्रगति

हातीं आलेल्या ताज्या आंकड्यांवरून देशांतील सर्व ठिकाणीं मिळून २८ लाखांवर लोकांस बी. सी. जी. लस टोचून त्यांचें क्षयरोगापासून संरक्षण करण्यांत आलें आहे. यासाठीं ८९ लाखांहून अधिक लोकांची तपासणी करण्यांत आली होती. एकट्या जून महिन्यांतच ५,१९,३०३ लोकांची तपासणी होऊन त्यांपैकीं १,७५,३९४ लोकांस बी. सी. जी लस टोचण्यांत आली.

## ब्रिटनमधील सार्वत्रिक निवडणुकांत झालेला खर्च

कोणत्याही देशाच्या निवडणुका होत असतांना अगर झाल्यावर निवडणुकांसाठी उभ्या राहिलेल्या उमेदवारांनीं केलेल्या खर्चासंबंधीं मतदारांना एक प्रकारची जिज्ञासा असते. सामान्यपणें अशी समजूत असते कीं जो उमेदवार अधिक खर्च करील त्याला यश येण्याचा संभव अधिक. सामान्यपणें उमेदवारांना काय खर्च येतो ह्यासंबंधींही लोकांना कुतूहल वाटत असतें. गेल्या ब्रिटिश सार्वत्रिक निवडणुकांच्या बाबतींत मतदारांची जिज्ञासा भागविण्याचें एक साधन ब्रिटिश सरकारनें उपलब्ध करून दिलें आहे. ब्रिटनच्या गृहखात्यानें निवडणुकींतील खर्चासंबंधीं एक पुस्तिका प्रसिद्ध केली आहे. तींत पुढीलप्रमाणें माहिती सापडते. ब्रिटिश निवडणुकांत १,३७६ उमेदवारांनीं मिळून ९,४६,१०८ पौंड रक्कम प्रचारासाठी खर्च केली. म्हणजे, दर उमेदवारामागें सरासरीनें ६९० पौंड खर्च झाला असा हिशोब होतो. १९५० अगर १९४५ सालीं झालेल्या सार्वत्रिक निवडणुकींत झालेल्या खर्चापेक्षा १९५१ सालीं कमी खर्च झालेला दिसून येतो. महागाईचें प्रमाण १९५१ सालीं अधिक असतांनाहि खर्च कमी झाला, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. १९४५ व १९५० सालीं झालेल्या निवडणुकांत एकूण खर्च १० लाख पौंडांपेक्षा अधिक झालेला आहे. २२८ निवडणुकांत ज्या उमेदवारांना अपयश आलें, त्यांचा खर्च यशस्वी झालेल्या उमेदवारांपेक्षा अधिक झालेला दिसून येतो. कांहीं कांहीं पराभूत उमेदवारांनीं तर यशस्वी उमेदवारांपेक्षा दुप्पट अधिक खर्च केलेला आहे. एका जागेच्या निवडणुकींत पराभूत उमेदवारानें यशस्वी उमेदवाराच्या तिपटीनें खर्च केल्याचें नमूद करण्यांत आलें आहे. इंग्लंड व वेलसमधील १४ उमेदवारांनीं १,००० पौंडांपेक्षा अधिक खर्च केला. पण, त्यांच्यापैकीं आठ जण निवडून आले नाहींत अयशस्वी झालेल्या उमेदवारांत एका उमेदवारानें सर्वांत अधिक म्हणजे १,१०१ पौंड खर्च केला. फार कमी खर्च केलेले कांहीं उमेदवारही होते. एका उमेदवारानें एकच पौंड खर्च केला होता. त्यानंतर दुसऱ्या एकानें ११ पौंड, तिसऱ्यानें ३९ पौंड व आणखी एका उमेदवारानें ८२ पौंड खर्च केलेला दिसून येतो. पण ह्या सर्वांची अनामत रक्कम जप्त झाली. सर्वांत अधिक खर्च छपाई आणि स्टेशनरीवर झालेला आहे. सर्व उमेदवारांनीं मिळून जितका खर्च केला त्यांपैकीं निम्म्याहून अधिक खर्च वरील बाबींवर झालेला आहे. मि. चर्चिल ह्यांच्या प्रचारासाठी ५५८ पौंड खर्च झाले. मि. ईडन ह्यांच्यासाठी ९४८ पौंड खर्च झाले. मि. ॲटली ह्यांनीं ६१३ पौंड खर्च केला. मि. मॉरिसन ७१४ पौंड, मि बीव्हन ५०० पौंड, मि. बटलर ७९७ पौंड, आणि मि. मॅकमिलन ६४० पौंड, असे इतर आंकडे आहेत भारतामधील सार्वत्रिक निवडणुकींत करण्यांत आलेल्या खर्चाची अशी माहिती प्रसिद्ध झाल्यास ती उद्बोधक वाटल्याशिवाय रहाणार नाहीं.

### आंकडेशास्त्राचे विक्षिप्त निष्कर्ष

"व्हर्सिटी" ह्या केंब्रिज विद्यापीठाच्या साप्ताहिकांत, तेथील विद्यार्थ्यांसंबंधीं कांहीं आंकडेवार माहिती प्रसिद्ध झाली आहे. सरासरी प्रत्येक विद्यार्थी रात्रीं ११-३८ वाजतां निजतो व सकाळीं ८-१७ ला उठतो. एका आठवड्यांत तो १०.५ प्रवचनें ऐकतो, १९.६ सिगारेटस ओढतो आणि २.५ वेळा स्नान करतो. अर्थात, अगदी ह्याप्रमाणें वागणारा विद्यार्थी कदाचित् सांपडणार नाहीं! तो अडीच वेळा स्नान करतो, ह्याचा अर्थ काय लावावयाचा?

## रॅली ब्रदर्स कंपनीचा इतिहास

नदीचा उगम जसा अगदी लहान असतो त्याचप्रमाणें मोठमोठ्या औद्योगिक कंपन्यांची सुरवातही बऱ्याच वेळीं अत्यल्प प्रमाणावर झालेली असते. सुप्रसिद्ध रॅली ब्रदर्स लिमिटेड ह्या कंपनीनें आपला उगम आणि विकास ह्यांची माहिती देणारें एक छोटेखानी पुस्तक प्रसिद्ध केलें आहे, त्यावरून वरील गोष्ट चांगली लक्षांत येते. हें पुस्तक मुख्यतः कंपनीच्या भागीदारांच्या माहितीसाठीं तयार केलेलें आहे. परंतु, केवळ कौटुंबिक भागीदारीपासून प्रारंभ करून रॅली ब्रदर्स कंपनीनें आज सर्व जगभर जो आपला व्यापारी पसारा केला आहे, तो लक्षांत घेतां ह्या पुस्तकासंबंधीं सार्वत्रिक कुतुहल वाटण्यास कांहीं हरकत नाहीं. शिवाय, ह्या कंपनींत आज पैसे गुंतविणाऱ्यांचे हितसंबंध गुंतलेले आहेत हेंही विसरून चालणार नाहीं. ह्या कंपनीनें आपली पहिली कचेरी लंडनला १८१८ मध्यें स्थापन केली, आणि भारतांत कलकत्त्यामध्यें १८५१ सालीं पहिली शाखा उघडली. मूळच्या कौटुंबिक भागीदारींत पांच भाऊ होते. प्रथमतः ते रेशीम आणि धान्य ह्या दोन वस्तूंचाच व्यापार करीत असत, पण हळूहळू कापूस, धातू, नीळ, इत्यादी पदार्थांचा व्यापारही त्यांनीं सुरू केला. लंडन, मँचेस्टर, मार्सेल्स, कॉन्स्टॅन्टिनोपल, ओडेसा, इत्यादी दूरदूरच्या शहरीं त्यांचा व्यवहार चाले ह्यावरून कंपनीनें आंतराष्ट्रीय व्यापारांत आपलें स्थान प्रथमपासूनच मिळविलेलें दिसून येतें.

१९२० सालच्या सुमारास कंपनीची वार्षिक उलाढाल ६.३ कोटी पौंडांच्या घरांत गेली. इतक्या प्रचंड प्रमाणावर व्यापारी उलाढाल पुन्हा करण्यास १९५०-५१ साल उजाडलें. कंपनीच्या छत्राखालील छोट्या कंपन्यांनीं केलेला व्यवहार लक्षांत न घेतां देखील वरील सालांत कंपनीनें ६.५ कोटी पौंडांची उलाढाल केली. अर्थात्, ह्या उलाढालीला कोरिआंतील युद्धामुळें आलेल्या तेजीचा फायदा मिळालेला आहे. १९५१ साल अखेर रॅली ब्रदर्स कंपनीच्या मालकीच्या निरनिराळ्या व्यापारी संस्थांत मिळून ४,१८० अधिकारी आणि १७,६७७ कामगार होते आज जगाच्या सर्व महत्त्वाच्या शेतीबाजारांत रॅली ब्रदर्स कंपनीनें आपलें स्थान मजबूत केलें आहे. आजची ही स्थिति कंपनीला केवळ पैशामुळें मिळणाऱ्या सत्तेमुळेंच मिळाली आहे, असें नव्हे. आपल्या मूळच्या व्यापारी परंपरेला चिकटून रहाण्याच्या तिच्या धोरणालाहि कांहीं श्रेय द्यावें लागेल.

### ओरिएंटलचा बोनस वाढला

ओरिएंटल विमा कंपनीनें १९५१ सालीं २२½ कोटी रुपयांचे ७३,४५९ विमे उतरले; प्रत्येक पॉलिसीची सरासरी रक्कम ३,०२५ रु. भरली. अहवालाचे वर्षअखेर बँकरेट वाढीमुळें कंपनीच्या रोख्यांचे किंमतींत ३ कोटी, ८२ लक्ष रुपये घसारा आला मूल्यमापनाचा दर ½ % वाढविला: २¾% चा २¼% केला, त्यामुळें ३ कोटी, ८२ लक्ष रुपये घसाऱ्यापैकीं २ कोटी, ४२ लक्ष रुपये घसाऱ्याची तरतूद होऊन उरलेला १ कोटी, ४० लक्ष रुपये घसारा त्रैवार्षिक नफ्यांतून कमी करावा लागला. तरीसुद्धा जाहीर केलेला नफा दर हजारी वार्षिक १२ रु. व १५ रु. बोनस देण्यास पुरेसा आहे म्हणजे, बोनस अनुक्रमें २ व २½ रु. वाढला आहे.

### आयर्लंडमध्यें वर्णभेद!

आयर्लंडमध्यें ह्यापुढें पांढऱ्याखेरीज इतर रंगाचीं डुकरें ठेवणें गुन्हा समजला जाईल. खाण्याचे जिन्नस करण्यास पांढऱ्या डुकरांचें मांस चांगलें असतें.

## राज्य सरकारांचीं नवीं कर्जें

मुंबई ( ३·५ कोटी रु ), प. बंगाल ( २ कोटी रु ), मद्रास ( ५ कोटी रु. ) व उत्तर प्रदेश ( २ कोटी रु. ) ह्याप्रमाणें एकूण १२·५ कोटी रुपयांचीं कर्जें चार राज्य सरकारें उभारीत आहेत. त्या सर्वांवर ४% व्याज देऊं केलेलें आहे, व तीं सव १९६४ सालीं परत फेडली जातील.

मुंबई व प बंगाल सरकारांच्या कर्जांची किंमत १०० रु. च्या रोख्यास १०० रु. ठेवण्यांत आली आहे. मद्रास सरकारचे रोखे अनुक्रमें ९९ रु १२ आ. व ९९ रु. ८ आ. ह्या किंमतीस मिळतील. मुंबई व कलकत्ता येथेंच गुंतविणारे ज्यास्त असल्या-कारणानें, मुंबई व प. बंगाल सरकारांच्या रोख्यांस ते आधी पसंत करतात, म्हणून इतर सरकारांना रोख्यांची किंमत थोडी कमी ठेवून आकर्षकता वाढवावी लागते. गेल्या वर्षांचा ३½% हा दर पूर्वींच्या अल्प व्याजाच्या दराच्या मानानें ज्यास्त होता आणि आतां तर ४% व्याज देऊं करून, स्वस्त पैशाच्या धोरणाचा शेवट झाला असें जाहिर केल्यासारखेंच झालें आहे. बँका आणि विमा कंपन्या ह्यांना त्यांचेजवळील रोख्यांवर फारच मोठा घसारा सोसावा लागला आहे— एकट्या ओरिएंटल कंपनीच्या रोख्यांस ३८२ लाख रुपये घसारा आला. त्यामुळें निर्माण झालेली परिस्थिति ४% व्याजाच्या रोख्यांमुळें सुधारणार नाहीं, हें उघडच आहे. मध्यम किंवा दीर्घ मुदतीच्या रोख्यांपेक्षा अल्प मुदतीचे रोखेच अशा संस्था आतां पसंत करूं लागल्या आहेत.


सध्याची बाजाराची परिस्थिति कर्ज उभारणीस फारशी पोषक नाहीं. म्हणून, शक्य तेवढा पैसा कर रूपानें उभारण्याचा प्रयत्न केला जात आहे. पंचवार्षिक योजनांस पैसा कमी पडत असतांना मोठ्या उत्पन्नाचे मार्ग ध्येयवादास बळी पडून सोडून देण्यांत येत आहेत अशी टीका तीव्रतर होऊं लागली आहे. अशा प्रत्यक्ष आर्थिक व मानसिक परिस्थितींत नवीं कर्जें उभारणी यशस्वी व्हावयाची असेल तर गुंतविणारांनीं पैशाची सुरक्षितता व त्यावर सुटणारें व्याज ह्यांसच प्राधान्य दिलें पाहिजे. पंचवार्षिक योजनेच्या ह्या दुसऱ्या वर्षांतच, राज्य सरकारांच्या समृद्धिकारक भांडवली योजना पैशाचे अभावीं लांबणीवर पडून भागणार नाहीं. तेव्हां, एकीकडे सरकारी खर्चांत बचत व उत्पन्नांत वाढ ह्यासाठी जागरूकपणें प्रचार चालू ठेवून, कर्ज उभारणीसहि योग्य तो हातभार लावणें योग्यच ठरेल.

### मुंबई सरकारचें कर्ज व त्याची परतफेड

मुंबई सरकाच्या नव्या कर्जाचें नांव ४% बॉंबे स्टेट डेव्हलपमेंट लोन, १९६४ असें राहील व्याज दरसाल १ फेब्रुवारी व १ ऑगस्ट रोजीं दिलें जाईल व त्यांतून इन्कम टॅक्स कापून घेण्यांत येईल. १९५३–५४ ते १९६४–६५ अखेर मुंबई सरकार दरसाल कर्जाच्या रकमेच्या १½% एवढी रक्कम बाजस काढील व त्यांतून कर्जाचे रोखे विकत घेईल म्हणजे, तेवढें कर्ज कमी होईल. त्याचप्रमाणें दरसाल सिंकिंग फंडहि काढण्यांत येईल

### उत्पन्न, खर्च, कर्ज व शिल्लक

मुंबई सरकारचें वार्षिक उत्पन्न सुमारें ५९·१९ कोटी रु आहे. १९४१–४२ सालापासून आतांपर्यंत ( १९४९–५० नंतरचीं तीन वर्षे वगळून ) दरसालचा चालू खर्च उत्पन्नांतून भागलेला आहे. १९५१–५२ अखेर डेव्हलपमेंट फंडांत ११·२९ कोटी रु. होते व मार्च १९५२ अखेर मुंबई सरकारजवळ ५·४९ कोटी रु. चे दीर्घमुदतीचे रोखे होते. सरकारच्या स्वतःच्या व्यापारी स्वरूपाच्या योजनांस दिलेला ॲडव्हान्स २·२१ कोटी रु. होता. मार्च अखेर सरकारला ३२·८४ कोटी रु. कर्ज होतें. मुंबई सरकारच्या आतां मालकीच्या झालेल्या कोल्हापूर येथील गिरणीसाठी सरकारनें ४० लक्ष रुपये कॅश क्रेडिट इंपीरिअल बँकेकडून घेतलें आहे. इंपीरिअल बँकेकडे ४ कोटी रुपयांचें दुसरें एक कॅश क्रेडिट खातें आहे. एकूण देण्यापेक्षां किफायतशीर शिल्लक पुष्कळच अधिक आहे.

SAVE to help yourself and the NATION
WITH THE

HOME SAFE
THE SARASWAT CO-OPERATIVE BANK LTD.
GIRGAON, BOMBAY.
*Branches:* Dadar, Mahim, Poona & Belgaum

---

## नाशिक डिस्ट्रिक्ट को-ऑपरेटिव्ह बोर्ड लि.

### सहकारी संस्थांना सूचना

नाशिक जिल्ह्यांतील सर्व सहकारी सोसायट्यांना कळविण्यांत येतें कीं, मुंबई सहकारी सोसायट्यांच्या कायद्यांतील कलम १९–अ, आणि त्यांतील नियम २६ अन्वयें, ज्या सहकारी संस्थेनें आपल्या सभासदांना ४ टक्के किंवा त्यापेक्षां अधिक डिव्हिडंड वाटण्याचें निश्चित केलें असेल अशा सोसायटीनें, इंस्टिट्यूटला, शिक्षण फंडाला वर्गणी दिली पाहिजे. नियम २६–अ यांत आणखी फेरफार करण्यांत आले असून डिव्हिडंड या शब्दांत बोनसचाही समावेश करण्यांत आला आहे. अशा शिक्षण फंडाची रक्कम जमा करण्याचा मुंबई प्रांतिक सहकारी इंस्टिट्यूटलाच फक्त अधिकार आहे. त्याप्रमाणें इंस्टिट्यूटनें पत्रक नं. २२।५१–५२ अन्वयें, इंस्टिट्यूटचे प्रतिनिधि म्हणून, इंस्टिट्यूटच्या वतीनें, जिल्हा सहकारी बोर्डास, इंस्टिट्यूटचा शिक्षण फंड गोळा करण्याचा आणि ४ टक्के किंवा त्यापेक्षां अधिक डिव्हिडंड वाटणाऱ्या सोसायट्यांकडून तो घेण्याचा अधिकार देण्यांत आला आहे. तरी नाशिक जिल्ह्यांतील वरीलप्रमाणें डिव्हिडंड वाटणाऱ्या सोसायट्यांनीं आणि ज्या संस्थांनीं 'इंस्टिट्यूटचा शिक्षण फंड' बाजूला काढून ठेवला आहे अशा संस्थांनीं शिक्षण-फंडाची वर्गणी यापुढें "नाशिक जिल्हा सहकारी बोर्ड" या संस्थेकडे भरावी. तसें मे० रजिस्ट्रार, को. सोसायटीज, पुणें, यांनीं सर्क्युलर काढून, असा फंड सदर संस्थेकडे शक्य तितक्या लवकर पाठविण्याबद्दल कळविलें आहे. तसें न घडल्यास सहकारी कायदा कलम ६० प्रमाणें तो गुन्हा घडेल.

एन्. वाय. कुलकर्णी
को. ट्रेनिंग इन्स्पेक्टर, नाशिक.

वामनराव गोविंदराव पाटील,
चेअरमन
नाशिक डि. को. बोर्ड लि.
नाशिक.

---

### जागतिक बँकेचे कर्जदार

जागतिक बँकेच्या ताज्या अहवालाप्रमाणें तिचे प्रमुख कर्जदार फ्रान्स, नेदरलंडस, ब्राझिल, आस्ट्रेलिया, मेक्सिको, बेल्जम, युगोस्लाव्हिया आणि भारत हे देश आहेत.

## कारकून वाढले, पण कामगार कमी झाले

१९५२ सालच्या पहिल्या सहामाहींत ग्रेट ब्रिटनें जेवढी निर्गत केली, तिच्यापेक्षां ४७ कोटी पौंड किंमतीची आयात ज्यास्त केली. १९५१ च्या पहिल्या सहामाहीपेक्षां ही तफावत ८ कोटी पौंडांनीं व १९५१ च्या दुसऱ्या सहामाहीपेक्षां १८ कोटी पौंडांनीं कमी आहे ह्या सुधारणेचें मुख्य कारण, आयातींत ८% घट झाली हें होय. "तथापि, घट पूर्वीपेक्षां कमी आली, एवढीच त्या देशास समाधानाची बाब आहे. जर्मन व जपानी स्पर्धा आतां व्यापारांत जाणवूं लागली आहे; अर्थात् निर्गत वाढवून आयात कमी केली पाहिजे. कारखान्यांना कच्च्या मालाचा तुटवडा पडतां कामा नये व शस्त्रवाढ कायम राहिली पाहिजे. तेव्हां अन्नधान्याची निपज वाढवून, त्यास संरक्षणाच्या खालोखाल प्राधान्य दिलें पाहिजे. परराष्ट्रीय बाजारपेठांत किंमती इतरांच्यापेक्षां कमी राखल्या पाहिजेत. कार्यक्षमतेंत सुधारणा न होतां किंवा कामांत वाढ न होतां वेतनांत वाढ होण्याची प्रवृत्ति नाशाप्रत नेणारी आहे ब्रिटिश राष्ट्रीय जीवनाचा तोलच बिघडलेला दिसतो. १९३१ ते १९५२ च्या दरम्यान कचेऱ्यांत काम करणारांची संख्या १० लाखांनीं वाढली, परंतु हातानें काम करणारांची संख्या उतरली. कारकून, टाइपिस्ट, इत्यादींची संख्या ६७% वाढली यांत्रिक प्रगतीचा हा थोडाफार परिणाम असला तरी ब्रिटिश कारखानदारीच्या आजच्या आधुनिकीकरणास व कार्यक्षमतेस ही प्रवृत्ति झेपण्याजोगी नाहीं."

—संडे टाइम्स

### डोक्यावरच्या ढगांचें पावसांत रूपांतर

"शास्त्रज्ञ व इंजिनिअर हे लवकरच पाऊस नियंत्रणाखाली आणूं शकतील व त्यामुळें अन्नधान्यांच्या उत्पादनास मदत होऊन लोकसंख्येच्या वाढीचा प्रश्न सुटेल. कॅनडा, अमेरिका, रशिया आणि ऑस्ट्रेलिया येथें हवामान बदलण्याच्या कांहीं पद्धति शोधून काढण्यांत आल्या आहेत. जादवपूर इंजिनिअरिंग कॉलेजचे डॉ. एस. के. बानर्जी व ऑस्ट्रेलियांतील कौन्सिल ऑफ सायंटिफिक अँड इंडस्ट्रिअल रिसर्चचे डायरेक्टर डॉ. ई. जी. बॉवेन, ह्यांनीं जवळ जवळ एकाच सुमारास, डोक्यावर थोड्या अंतरावर असलेल्या ढगांचें पाणी करण्याचा शोध लावला आहे. अर्थात्, अद्याप कितीतरी गोष्टींची व्यवस्था करावयाची आहे. हवामान बदलावयाच्या सर्व योजना, आंतरराष्ट्रीय मंजुरीच्या अन्वयें सरकारी हुकमतीखालीं असाव्या लागतील. नाहींतर, एका प्रदेशावर पाऊस पाडतांना नको त्या प्रदेशांतहि महापूर यावयाचे. ":— बिहार सरकारचे संशोधन इंजिनिअर, श्री. सुबोधकुमार घोष, ह्यांचें पाटणा येथील शुगरकेन रिसर्च इन्स्टिट्यूटमध्यें भाषण.

**कच्च्या फिल्मचा कारखाना**— म्हैसूर संस्थानांतील कृष्णराजसागर ह्या ठिकाणीं कच्ची फिल्म तयार करण्याचा कारखाना उभारण्याचा भारतीय सरकारचा विचार आहे. ह्या ठिकाणची हवा कारखाना काढण्यास विशेष अनुकूल आहे असें कळतें.

**वर्णभेद राखण्याची किंमत**—द. आफ्रिकेच्या सरकारचे माजी आरोग्यमंत्री डॉ. ग्लुसमन ह्यांनीं असें मत व्यक्त केलें आहे कीं, द. आफ्रिकन सरकारचें वर्णभेदाचें धोरण पूर्णपणें अंमलांत आणावयाचें झाल्यास त्यासाठी ४,२०,००,००,००० पौंड खर्च करावे लागतील. ही किंमत जबरदस्त आहे असें त्यांचें म्हणणें आहे.


## ठेवी स्वीकारण्यांत येतात

ठेवींवर दरसाल दर शेंकडा ७॥ रुपये व्याज दिलें जातें. व्याज दर तीन महिन्यांनीं दिलें जातें. ठेवीदारास ठेवीची मुदत संपण्यापूर्वी आपली रक्कम परत पाहिजे असल्यास एक महिन्याच्या आगाऊ नोटिसीनें केव्हांही व्याजासह परत मिळूं शकते.

### पेडणेकर आणि कंपनी लिमिटेड

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी,

१७२, गिरगांव रोड, मुंबई ४

टेलिफोन २२७३८ तारेचा पत्ता: 'PEDNECO' Bombay



## भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

### मुख्य कचेरी:–भोर, जि. पुणें.

. शाखा:–पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७१,६०० |

### बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिगरे, अध्यक्ष. न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.

रावसाहेब य. द. खोले. श्री. चं. रा. राठी.

श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी. श्री. बा. ग. धंदुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठीं कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:–बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबाजवळ. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठीं लिहा.

वाय. एस. जोशी

ॲ. मॅनेजर.





## सिंद्रीच्या खत कारखान्याचें महत्त्व व अर्थबोध

बिहारमधील कोळसा सांपडणाऱ्या भागांत उभारण्यांत आलेला सिंद्री येथील खताचा कारखाना म्हणजे भारताच्या औद्योगीकरणांतील एक महत्त्वाचें पाऊल आहे. कारखान्यांत दरवर्षी तयार होणाऱ्या ३,५०००० टन अमोनिअम सल्फेटमुळें सालीना १० लाख टन अन्नधान्य निर्माण होईल आणि आयात धान्यासाठी खर्च होणारे ३ कोटी पौंड वांचतील. त्याशिवाय कारखान्यांत निर्माण होणाऱ्या ८०,००० किलोवॅट विजेमुळें सिमेंट, प्लॅस्टिक आणि स्फोटकें ह्यांच्या उत्पादनाची पूर्वतयारी होईल. ह्या कारखान्यांत यंत्रांचा जास्तींत जास्त उपयोग करण्यांत आला असल्यामुळें फक्त २,००० कामगार तो चालविण्यास पुरतात. त्यापैकीं १,७४० कुशल कामगार आहेत कारखान्याचें भांडवल १.७ कोटी पौंड आहे म्हणजे भांडवलाच्या मानानें फार थोड्या लोकांना कारखान्यांत रोजगारी मिळाली आहे. अविकसत राष्ट्रांच्या औद्योगिक प्रगतीच्या मार्गातील अडचणी ह्या कारखान्याच्या उभारणींत प्रतिबिंबित झालेल्या दिसतात. भारतांत लोकसंख्या, बुद्धि व इतर साहित्य आहे; पण, यंत्रविद्या अवगत असणाऱ्या कामगारांची परंपरा नाहीं. फिटर्स नाहींत, कामगारांसाठी घरें नाहींत, व्यवस्थापकीय अधिकारीहि नाहींत.

सिंद्री कारखान्यांत तयार होणाऱ्या विजेनें आसपासच्या खाणी आणि हजारीबाग ह्या गांवाला विद्युत्-पुरवठा करण्यांत येत आहे. पण, कारखान्याच्या विस्ताराला वाहतुकीच्या अपुऱ्या व्यवस्थेचा मोठा अडथळा आहे. यंत्रसामुग्री इतकी अवजड होती कीं ती रेल्वेनें जागेवर आणणें शक्य नव्हतें; म्हणून ती पद्दावानें पाटण्याला धाडण्यांत आली आणि नंतर लॉरीनें नेण्यांत आली· आणि त्यासाठीं कित्येक आठवडे खपून एक खास रस्ता बांधावा लागला. राहत्या जागेचीहि हीच तऱ्हा; सुमारें ३० लाख पौंड खर्चून एक स्वतंत्र वसाहतच वसवावी लागली, आणि तींत बाजार, इस्पितळ, शाळा, अधिकाऱ्यांचे बंगले, इतरांचीं घरें, इत्यादि सोयी करून द्याव्या लागल्या. अशा बाबींवर खर्च करावा लागला म्हणजे साहजिकच मूळ योजनेचा भांडवली खर्च वाढतो. इंग्लंडसारख्या देशांत तसा तो वाढत नाहीं. चित्तरंजन येथें बांधण्यांत आलेल्या रेल्वे एंजिनाच्या कारखान्याला जितका भांडवली खर्च लागला त्यापैकीं निम्मा वसाहत वसविण्यावरच खर्च करावा लागला तथापि औद्योगीकरणासाठी लागणारे साधे कामगार, कुशल कामगार व व्यवस्थापकीय अधिकारी ह्यांना तयार करण्यासाठी होणारा खर्च तर ह्याहूनहि अधिक असतो. भारतांतील सामान्य कामगार अद्याप खेड्यांतच वावरणारा आहे. त्याला गैरहजर न राहण्याचें अगर वेळेवर येण्याचें महत्त्व नीटसें पटलेलें नाहीं. नाजूक यंत्रसामुग्री पुष्कळदा धसमुसळेपणानें वापरली जाते. यंत्रांच्या जीवमानाच्या भाषेंत असा हिशेब करता येतो कीं एक कुशल कामगार तयार करण्यास सुमारें ३,७५० पौंड खर्च येतो. मुंबई अगर जमशेटपूर सारख्या केंद्रांतून आतां खराखुरा कामगारवर्ग अस्तित्वांत आला आहे. परंतु तोहि अद्यापि प्रथमावस्थेंतच आहे. 'अमोनिएटेट प्रॉडक्टस' सारखा स्फोटक कारखाना नीट चालवयाचा झाला तर, भारताच्या सध्यांच्या परिस्थितींत सुद्धां जास्तींत जास्त यांत्रिकीकरण करणें भागच होतें.

कामगारवर्गाचा मागासलेपणा, 'फोरमन' निवडण्यांत येणाऱ्या अडचणी अगर त्यांच्यांत कौशल्याचाचा अभाव ह्यांच्या रूपानें प्रत्ययास येतो. भारतांतील निरक्षरता आणि यांत्रिक काम पिढ्यानुपिढ्या करणाऱ्या कुटुंबांची दुर्मिळता, ह्या गोष्टी 'फोरमन' तयार करण्याच्या बाबतींत फार बाधक ठरतात. कांहीं रेल्वे वर्कशॉप्स आणि जमशेदपूर येथें ह्या बाबतींत परिस्थिति जरा बरी आहे. पण तेथेंहि पारशी, अँग्लो-इंडिअन्स अशांचीच निवड करावी लागते. तरीहि त्यांच्यांतील धार्मिक व भाषिक भेद पुष्कळदा चांगलें काम होण्याच्या आड येतात.

ही अडचण दूर करण्याकरितां कांहीं थोडीं सुशिक्षित माणसें चांगल्या पगारावर नेमण्याची पद्धत सिंद्री येथील कारखान्यांत अवलंबिण्यांत आली आहे. ह्या नवीन सुशिक्षित कामगारवर्गांत बहुतेक लोक कुशल कामगार असून पदवीधर आहेत. त्यांना इंग्लिश आणि हिंदी व स्वतःची मातृभाषा चांगली समजते. अशा कामगारवर्गाला कारखान्यांतील गुंतागुतीची यंत्रसामुग्री नीट वापरण्यासाठी शिक्षण देणें कठीण जाणार नाहीं. पण सर्वापेक्षां अधिक अडचणी व्यवस्थापकीय अधिकारी निर्माण करण्याच्या मार्गात आहेत. भारताच्या उद्योगधंद्यांतील बराचसा मालकवर्ग हा बानिआ अगर जैन आहे. त्याचा हस्तकौशल्याशीं अगर बुद्धिप्रधान व्यवसायांशीं फारसा संबंध आलेला नाहीं त्यामुळें तो पुष्कळदा उत्तम धनपति असतो, बाजारांत आपली पत कशी टिकवावी ह्याची त्याला माहिती असते. पण, तांत्रिक ज्ञान अगर धंदेवाईक सचोटी ह्याबाबतींत तो लंगडा असतो. ही परिस्थिति आर्थिक व सामाजिक दृष्ट्या धोक्याची असते. ती सुधारण्याचे प्रयत्न कांहीं ब्रिटिश व हिंदी कंपन्या करीत आहेत पण अजून पुष्कळच कार्य व्हावयाचें आहे. सिंद्री कारखान्यांत औद्योगिक व्यवस्थापकीय शिक्षण मिळण्याची उत्तम संधि आहे. सध्या तेथें सहा परदेशीय तंत्रज्ञ आहेत आणि ते हिंदी उमेदवारांना शिक्षण देत आहेत. एका बाबीकडे मात्र सिंद्री कारखाना उभारणाऱ्यांचें लक्ष नीटसे गेलेलें दिसत नाहीं. नुसतें खत उत्पन्न करून भागण्यासारखें नाहीं. त्याच्या विक्रीची संघटनाहि झाली पाहिजे. शेतकऱ्याला तें पाहिजे तेव्हां, आणि पाहिजे तितक्या प्रमाणांत मिळालें पाहिजे. खताचा उपयोग कसा करावा हेंहि हिंदी शेतकऱ्याला शिकविलें गेलें पाहिजे. हें काम नीट झालें नाहीं तर, सध्या अमोनिअम सल्फेटच्या आयातीवर सालीना जे ७० लाख पौंड खर्च होतात ते वांचले तरी तितक्या खताच्या योगानें पिकणारें जें अन्नधान्य सध्या आयात करावें लागतें त्याची किंमत कांहीं वाचणार नाहीं. तथापि कुशल कामगार व व्यवस्थापकीय वर्ग तयार करणें, शहरी संवयी निर्माण करणें, घरें बांधणें, वाहतुकीची व्यवस्था करणें इत्यादींबाबत सिंद्री जो मार्ग घालून देत आहे, त्यामुळें असेच दुसरे कारखाने उभारणें सोपें जाणार आहे हें मात्र निश्चित.

---

**वनमहोत्सवाची फलश्रुति**—मिरज तालुक्यांत गेल्या वर्षीच्या वनमहोत्सवाच्या निमित्तानें ८,२५० झाडें लावण्यांत आलीं होतीं. त्यांपैकीं ६,७६० झाडें तग धरून आहेत. माळगांव ह्या खेड्यांत १,२६२ झाडें लावण्यांत आलीं होतीं त्यापैकीं १,१२७ जगल्यामुळें वरील गांवाला बक्षिस देण्यांत आलें आहे.

**मेण तयार करण्याची योजना**—काश्मीरमधील जंगलांत सांपडणाऱ्या कांहीं झाडांपासून सिलाईसाठी वापरण्याचें मेण तयार करण्याची एक योजना काश्मीर-सरकारनें आंखली आहे ह्या कामांत एका भारतीय तज्ज्ञानें काश्मीर-सरकारला मदत केली आहे.

**सौराष्ट्रांत नवें कॉलेज**—सौराष्ट्रांत अलिआबाद येथें एक आर्ट्स कॉलेज निघण्याचें घाटत आहे गुजराथ विद्यापीठानें ह्यासंबंधीं चौकशी करण्यासाठी एक कमिटी नेमली आहे. हें नवीन कॉलेज बहुधा १८ जून, १९५२ पासून सुरू होईल.

### पूर्व-युरोप भारताला मदत करण्यास तयार

मॉस्को येथें कांहीं महिन्यांपूर्वी होऊन गेलेल्या आर्थिक परिषदेला श्री. राणे हे भारतीय कारखानदार गेले होते. त्यांनीं रशिआ, झेकोस्लोव्हाकिआ, पोलंड, पूर्व जर्मनी, पश्चिम जर्मनी, डेनमार्क, इंग्लंड, इत्यादि देशांत दौरा केला. ते नुकतेच भारताला परत आले; तेव्हां त्यांनीं अशी माहिती सांगितली कीं पूर्व जर्मनी आणि झेकोस्लोव्हाकिआ भारताला हरएक प्रकारच्या वस्तू व मध्यम आणि अवजड यंत्रसामुग्री पुरविण्यास तयार आहेत. ह्या मालाच्या किंमतीही बाजारांतील स्पर्धेप्रमाणें कमीजास्ती करण्यास ते देश तयार आहेत. पूर्व-जर्मनींतील रेल्वेचें साहित्य तयार करणारा एक कारखाना भारताच्या रेल्वेविषयक गरजा पुरविण्यास तयार आहे. भारताकडून ते किंमत कशी घेणार असें विचारतां श्री. राणे म्हणाले कीं भारताच्या सवडीप्रमाणें आणि भारताजवळ जो माल स्वतःच्या गरजा भागून शिल्लक उरत असेल त्यांच्या बदला वरील माल देण्यास ते देश तयार आहेत. शिवाय व्यापारी सौदा करतांना ते इतर कांहीं अटीहि लादत नाहींत. कारखाने दाखविण्याबाबत कांहीं गुपित राखण्याची वृत्ति त्यांना पू. जर्मनींत दिसली नाहीं. रेल्वेच्या वरील कारखान्यानें भारतीय सरकारच्या रेल्वे-खात्याच्या अधिकाऱ्यांना सर्व कारखाना पाहूं देण्याची तयारी दाखविली होती. ह्या कारखान्याकडून त्यांना आलेली एक तारही त्यांनीं पृच्छकांना दाखविली. श्री. राणे ह्यांच्या मतानें भारताला आज ज्या तांत्रिक ज्ञानाची आवश्यकता आहे, तें सर्व ज्ञान झेकोस्लोव्हाकिआ देऊं शकेल.

### ब्रिटनमध्यें वृद्धांची संख्या अधिक

ता. ३० जून, १९५२ अखेर इंग्लंड आणि वेल्स ह्यांत मिळून ४,३,८,०,०,००० लोक होते आणि त्यांपैकीं १९·१ टक्के लोक बृहन्लंडनमध्यें केंद्रित झाले होते. वरील लोकसंख्येपैकीं निम्म्याहून अधिकजण १,००,००० अगर अधिक लोकवस्ती असलेल्या गांवांत रहात होते. एकदंरीनें पहाता, बायका पुरुषांच्या पेक्षां तेथें अधिक जगतात असें आढळून आलें आहे. ८५ वर्षांपेक्षां अधिक वय असलेल्या नागरिकांत १,३२,००० स्त्रिया आढळून आल्या; ह्याच गटांत पुरुष मात्र ५९,००० होते. एकूण लोकसंख्येंत पुरुषांपेक्षां स्त्रियांची संख्या १७,०२,००० नीं अधिक आढळून आली. जून नंतर जमविण्यांत आलेल्या अधिक आकड्यांवरून असें आढळून आलें आहे कीं, ब्रिटनमध्यें वयस्कर नागरिकांची संख्या वाढत आहे. ५० वर्षांपूर्वी एकूण लोकसंख्येंत १५ वर्षां खालील मुलें अगर मुली ह्यांचें प्रमाण शेंकडा ३२·४ टक्के पडत असे. आतां हीं टक्केवारी २२·२ टक्के आहे. ह्याचा अर्थ असा कीं, १९०१ सालापेक्षां आज वयांत येणाऱ्या मुलांची संख्या कमी झाली आहे. कोणत्याही राष्ट्रांत वृद्धांची अगर वयस्कर माणसाची संख्या जास्त झाली तर आर्थिक दृष्ट्या अनुत्पादक अशीं माणसें वाढत जातात, असा आक्षेप घेण्यांत येतो. पण वयस्कर माणसांची काम करण्याची शक्ति कायम असेल तर आर्थिक दृष्ट्या त्यांचा बोजा वाटण्याचें कारण नाहीं. आधुनिक वैद्यकीय शास्त्राचा उपयोग करून वयस्कर माणसांची कार्यक्षमता टिकविणें शक्य होतें.

### व्याज ज्यास्त द्या

ऑस्ट्रेलियांतील बँकांना, तेथील सरकारनें ओव्हरड्राफ्टवरती ज्यास्त दरानें व्याज आकारण्याची सूचना दिली आहे.

## राजगोपालाचारींचें आवाहन

### "पुढील पिढ्यांसाठी कांहीतरी करूं या!"

मद्रास राज्याचे पंतप्रधान, श्री. चक्रवर्ति राजगोपालाचारी ह्यांनीं रेडिओवर भाषण करून, मध्यमवर्गीयांनीं आपली बचत सरकारी रोख्यांत गुंतवावी असें सांगितलें. ते म्हणाले, "आपला देश उघड्या डोळ्यांनीं एकदां हिंडून पाहा. मोठमोठीं देवळें, रस्त्याच्या दुतर्फा झाडें, मोठालीं धरणें, हीं काय सांगतात? आपल्या पूर्वजांनीं स्वतःकरतां ह्या गोष्टी केल्या नाहींत, तर त्यांनीं स्वतः स्वार्थत्याग करून, मागाहून येणाऱ्या पिढ्यांच्या सुखसोयी पाहिल्या. आपल्या मागाहून येणाऱ्यांसाठीं आपण कांहीं करून ठेवलें आहे काय? फारसें नाहीं; पुरेसें नाहीं. आपल्या चैनी व आपलीं दुःखें ह्यांच्यांतच आपण गुरफटलेले आहोंत. असंख्य पिढ्यांच्या साखळींतील आपण एक दुवा आहोंत, हें विसरूं नका. तेव्हां, आपणहि पुढील पिढ्यांसाठीं कांहींतरी मोठें करून ठेवूं या. त्यासाठींच सरकार कर्ज उभारीत आहे. मोठ्या कामांसाठी येणारा खर्च एकाच वर्षाच्या उत्पन्नांतून मागविता येत नाहीं. सरकारपेक्षां ज्यास्त सुरक्षित दुसरी बँक नाहीं आणि राज्याइतकी दुसरी भक्कम लोखंडी पेटी नाहीं."

### बेकायदा विवाह कायदेशीर करण्यासाठी मुंबई सरकारचें बिल

श्री. शांतिलाल रघुनाथ आणि श्रीमति सुभद्राबाई शिवलाल ह्यांचा विवाह अमरेळी येथें ११ ऑक्टोबर, १९४९ रोजीं तेथील सब रजिस्ट्रारनें नोंदविला. सबरजिस्ट्रार, वर आणि वधु ह्या सर्वांचीच कल्पना अशी होती, कीं सब रजिस्ट्रारला विवाहनोंदणीचा अधिकार होता. वास्तविक, १६ जानेवारी १९५१ पर्यंत त्याची रजिस्ट्रार ऑफ मॅरेजेस म्हणून नेमणूक झालेलीच नव्हती. दांपत्याला अपत्याहि झालें आहे. अधिकार नसतांना परंतु अधिकार आहे अशा कल्पनेनें सब रजिस्ट्रारनें लावलेला हा विवाह कायदेशीर करण्यासाठी मुंबई सरकारनें आतां बिल तयार केलें आहे.

### आयात-निर्गत

भारतानें १९५२ च्या पहिल्या तीन महिन्यांत २६९·७७ कोटी रुपयांचा माल आयात केला. त्यांपैकीं १२३·४२ कोटी रुपयांचा माल डॉलर गटांतील देशांकडून व १४६·३५ कोटी रुपयांचा माल स्टर्लिंग गटांतील देशांकडून आला.

भारतानें ह्याच मुदतींत १७२·७२ कोटी रुपयांच्या मालाची निर्गत केली. त्यापैकीं ४०·६५ कोटी रुपयांचा माल डॉलर गटाकडे व १३२·०७ कोटी रुपयांचा माल स्टर्लिंग गटाकडे गेला.

गहूं, (५९ कोटी रु.), कापूस (४९ कोटी रु.), ताग (१४ कोटी रु.), तांदूळ (७ कोटी रु.), ज्वारी-बाजरी (६ कोटी रु.), आणि लोखंड-पोलाद (६ कोटी रु.), असे आयातीचे प्रमुख आकडे आहेत.

तागाचें कापड, (५६ कोटी रु.), चहा (२२ कोटी रु.), कपास-कापड (१४ कोटी रु), मसाल्याचे पदार्थ (१० कोटी रु.) असे निर्गतीचे प्रमुख आकडे आहेत

व्यापारापैकीं निम्म्यापेक्षां जास्त व्यापार ग्रेट ब्रिटन, अमेरिका व पाकिस्तान ह्यांचेशीं झाला.

### ऑलिंपिक सामन्यांचा खर्च

ऑलिंपिक सामने फिनलंडमध्यें भरविण्यांत आले, त्याचा सर्व त्या देशास सुमारें ४६,००,००० पौंड आला.

हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें